गुन्हेगारी-घटनेस वाचा फोडुन झुंज देणारे एकमेव दैनिक

दैनिक
# झुंजार जनता

R.N.I. No.MAHMAR/2022/82590 Mo. 8180068180

वर्ष :३ रे | अंक ४७ | रविवार दि.१०/११/२०२४ | पाने ४ | किमत ४ रु | POSTAL Reg.No.CSN/RNP/537/2024-2026

*** सुविचार ***

"पैशाचा माज फक्त माणसापुढेच चालतो, कर्मा पुढे भले-भले भीक मागतात"..!

# मनोज जरांगे यांच्या आजच्या पाथर्डी दौऱ्याने राजकीय समिकरण बदलणार

## शेवगाव- पाथर्डी विधानसभा मतदारसंघात जरांगे पाटलांच्या भुमिकेची उत्सुकता



**नगर :** शेवगाव -पाथर्डी विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी चालू असताना मनोज जरांगे पाटलासंदर्भात तर्क वितर्क लावले जात आहे. विधानसभा निवडणुकीत जरी मनोज जरांगे यांनी माघार घेतली असली तरी ते अनेक मतदारसंघात खाजगी कार्यक्रमाला हजेरी लावून मराठा बांधवांनी चर्चा करून उपस्थितांना मार्गदर्शन करत आहेत. मनोज जरांगे यांच्या आजच्या पाथर्डी दौ-याने राजकीय समिकरण बदलणार असल्याची जोरदार चर्चा दिवसभर चालू होती. शेवगाव- पाथर्डी विधानसभा मतदारसंघाबाबत जरांगे पाटलांच्या भुमिकेचीउत्सुकताशिगेलापोहोचलीआहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, मराठा संघर्ष यौद्धा मनोज जरांगे आज दुपारी पाथर्डी तालुक्यात एका खाजगी कार्यक्रमाला येत आहे. निवडणूक काळात त्यांचा दौरा असल्याने विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पाटील सध्या राजकारणापासून जरी अलिप्त दिसत असले तरी ते सकल मराठा समाजाशी चर्चा करून गमिनी काव्याने कोणाला पाडायचे यांचा कानमंत्र देत असल्याचे बोलले जात आहे. जरांगे पाटील जरी यालाच मतदान करा असे स्पष्ट सांगत नसले तरी त्यांच्या सांकेतिक भाषेत ते कोणाला पाडा असे स्पष्ट संकेत देत असल्याने सकल मराठा समाजाला त्यांची सांकेतिक भाषा कळत असल्याने ज्या व्यक्तींनी मराठा आरक्षण आंदोलन, उपोषण स्थळी भेट देवून पाठिंबा दर्शविला अशा उमेदवारांना मराठा समाज डोक्यावर घेतल्याशिवाय राहणार नाही. एकुणच जरांगे पाटील यांच्या दौ-याकडे अनेकांचे आज लक्ष असणार आहे.

## पुढील ४ महिने कांदा, लसूण आणखी महागणार

**मुंबई :-** किरकोळ बाजारात कांदा आणि लसणाचा तुटवडा निर्माण झालाय... कांदा ८० रुपये किलोवर गेलाय... तर लसूण ४०० रुपये किलोवर गेलाय... कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कांदा आणि लसणाची आवक कमी झाल्यामुळे तुटवडा जाणवत आहे.... पुढील ३ ते ४ महिने कांदा आणि लसणाचे दर चढेच राहणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आलाय. याचा परिणाम सर्व सामान्य नागरिकांसह शेतक-यांवर ही होतोय... जोरदार पावसामुळे कांदा सडल्याने कांद्याच्या उत्पादनात मोठी घट झालीय... दरम्यान खरिपातील कांद्याची बाजारात आवक सुरू झाल्यानंतर कांद्याच्या दरात काहीसा दिलासा मिळेल ..

------------------------

## अमित शाह आज महाराष्ट्र दौऱ्यावर

मुंबई : आज पुन्हा राज्यात प्रचाराची रणधुमाळी पाहायला मिळणारेय. केंद्रीय गृहमंत्री आज महाराष्ट्राच्या दौ-यावर आहेत. बुलढाणा आणि जळगावात प्रचार सभा घेणारेत. अमित शाहांच्या हस्ते आज महायुतीच्या संकल्पपत्राचं प्रकाशनदेखील केलं जाणारे. महिला, तरुण, बेरोजगारीसारखे विषय या संकल्पपत्रात मांडले जाण्याची शक्यताये.



**किनवट :-** मांडवी बाजारात आलेल्या कोलामपोड येथील मतदारांशी संवाद साधून मी मतदान करणारच अशी शपथ घेताना स्वीपचे सदस्य तथा केंद्र प्रमुख उत्तम कानिंदे...

**छाया:- संतोष डवरे, किनवट**

## किनवट मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची १० नोव्हेंबरला द्वितीय तपासणी...

**संतोष डवरे,किनवट :** - भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने ८३- किनवट विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची द्वितीय तपासणी रविवारी १० नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते सायं. ५ यावेळेत निवडणूक खर्च तपासणी कक्ष, आय. टी.आय. , किनवट येथे केली जाणार आहे. या तपासणीसाठी उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी निवडणुकीच्या अनुषंगाने केलेल्या खर्चाचा हिशोब खर्च निरीक्षक यांच्यासमोर सादर करणे आवश्यक आहे.अनुपस्थित राहणारे उमेदवार भारत निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी निर्गमीत केलेल्या परिपत्रकांनुसार कार्यवाहीस पात्र असतील. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशेब ठेवणे व दाखल करण्याच्या कायद्याच्या आवश्यकतांचे अनुपालन करण्यात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने कसूर केल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम १० क अन्वये तो निवडणूक आयोगाकडून तीन वर्षाच्या कालावधीसाठी निरर्ह ठरविण्यास पात्र असेल याची नोंद घ्यावी.लोकप्रतिनिधीत्व अधिनियम , १९५१ च्या कलम ७७ नुसार निवडणुकीच्या वेळेस उमेदवार एकतर तो स्वत: ,ती स्वत: किंवा त्याच्या, तिच्या निवडणूक प्रतिनिधीद्रे त्याला, तिला नामनिर्देशित करण्यात आले आहे. त्या दिनांकापासून निवडणुकीच्या निकाल लागण्याच्या दिनांकापर्यत दोन्ही दिनांक धरुन, त्याने किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीने केलेला किंवा प्राधिकृत केलेल्या सर्व खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ठेवणे आवश्यक आहे, असे ८३- किनवट विधानसभा मतदार निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली (भाप्रसे) यांनी प्रसिध्दीपत्रकाद्रे कळविले आहे.

## आगामी विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने श्री. दत्तात्रय कराडे (विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परीक्षेत्र) यांची पत्रकार परिषद आयोजित.

**नाशिक प्रतिनिधी : माजिद खान**

दि.१५/१०/२०२४ पासून संपुर्ण राज्यात महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ प्रक्रियेची आदर्श आचार संहिता आंमलात आहे. प्रक्रिया शांततेत, निर्भीड वातावरणात पार पडणेकरीता नाशिक परिक्षेत्रीय अहिल्यानगर, जळगांव, नाशिक ग्रामीण, धुळे व नंदुरबार जिल्हयांमध्ये मा. भारत निवडणुक आयोग यांचे मार्गदर्शनाखाली उपाययोजना व पुर्वतयारी करण्यात आली आहे. गुजरात आणि मध्यप्रदेश राज्यांचे सीमेवरील नाशिक, धुळे, जळगांव व नंदुरबार जिल्हयांचे सरहद्दीवर एकुण ३८ चेक पोस्ट व ३४ मिरर चेक पोस्ट आहेत. या चेक पोस्टवरील तपासणीत आजपावेतो एकुण २ कोटी १० लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल व रोख रक्कम जप्त केली आहे. पाचही जिल्हयांमध्ये निवडणुकीचे पार्श्वभुमीवर २६४ भरारी पथके तयार करण्यात आलेली



आहेत. आचारसंहिता सुरु झालेपासुन आजपावेतो नाशिक परिक्षेत्रामध्ये एकुण ६ कोटी ५३ लाख रोख रक्कम, ५२ अग्नीशस्त्रे व ८९ काडतुसे, इतर घातक शस्त्रे तसेच रु.५ कोटी ७५ लाख किंमतीची अवैध दारु, रु.२ कोटी ६७ लाख किंमतीचा गांजा/अंमली पदार्थ व ३४ कोटी किंमतीचे मौल्यवान दागिने व प्रलोभन वस्तु असा एकुण ४९ कोटी ०७ लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल व रोख रक्कम जप्त केली आहे. नाकाबंदी आणि गस्ती दरम्यान अहिल्यानगर जिल्हयात एकाच २३ कोटी ७२ लाख किंमतीचे सोन्या-चांदीचे दागीने व जळगांव जिल्हयात १ कोटी ४५ लाख रोख रक्कम जप्त केली आहे. नंदुरबार व धुळे जिल्हयांत मोठ्या प्रमाणावर तलवारी/चाकु/कोयते जप्त केले आहेत. धुळे घटकात गांज्याची शेती उध्वस्थ केली आहे. नाशिक ग्रा. जिल्हयात रु.२० लाख ३४ हजार रुपयांचा गांजा वाहतुक करतांना जप्त केला अशा स्वरुपाच्या मोठा कारवाया करण्यात आल्या आहेत. पाचही जिल्हयांमधील १६,८९१ सराईत गुन्हेगार व उपद्रवी इसमांविरुध्द विविध कलमांखाली प्रतिबंधक कारवाया केल्या असुन त्यात MPDA अंतर्गत १२ सराईत गुन्हेगारांना स्थानबध्द व १२३ इसमांविरुध्द तडीपारीची कारवाई केलेली आहे. निवडणुक प्रक्रियेकरीता केंद्रीय पोलीस दलाच्या (उशपींॲरश्र अऑशव झेश्रळलश ऋॲलश) एकुण ८४ प्लाटुन पाचही जिल्हयांमध्ये



केल्या आहेत. जिल्हयांमधील पोलीस अधिकारी व विविध विभाग प्रमुखांसोबत समन्वय बैठका घेऊन निवडणुक बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच गुजरात व मध्यप्रदेश राज्यांशी विविध स्तरांवर यापुढेही सराईत गुन्हेगार, उपद्रवी इसम, अवैध हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून अधिक धडक आणि कठोर कायदेशीर कारवाईत करण्यात येत आहे. नाशिक परिक्षेत्रातील सर्व नागरीकांना आवाहन येते की, विधानसभा निवडणुका निर्भय व मुक्त वातावरणात होण्यासाठी निवडणुकीचे अनुषंगाने आपणांस प्राप्त असलेली माहिती संबंधीत जिल्हयातील जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हा प्रमुख व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना अवगत करावी. तसेच सर्व नागरीकांना मतदानाचा हक्क बजावणीबाबत आवाहन करण्यात येत आहे. पोलीस अधिकारी व अंमलदार हे मतदान प्रक्रियेत व्यस्त असल्याने, देखील मतदानाचा हक्क बजाविता यावा यासाठी पोस्टल बॅलेटची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

## शरद पवार यांची रविवारी गंगापूरात जाहीर सभा

**गंगापूर प्रतिनिधी- हारुन पठान**

**गंगापूर**-खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार सतीश भानुदासराव यांच्या प्रचारार्थ खा.शरद पवार यांची रविवारी दुपारी दोन वाजता जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. गंगापूर शहरातील नवीन बसस्थानकाजवळील सोमाणी मैदानावर ही सभा होणार असून महाविकास आघाडीच्यावतीने सभेची जय्यत तयारी करण्यात येत आहे. या सभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार, काँग्रेस, शिवसेना व मित्र पक्षाचे खासदार, आमदार, पदाधिकारी, कार्यकर्ते आदींची असणार आहे. आमदार सतीश चव्हाण यांच्या प्रचारार्थ गंगापूर व खुतलताबाद तालुक्यातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते विविध गावांमध्ये डोअर टू डोअर जाऊन मतदारांना सभेचे निमंत्रण देत आहेत. सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन गंगापूर-खुलताबाद तालुका महाविकास आघाडीच्यावतीने करण्यात आले आहे. *आमदार सतीश चव्हाण यांचा गाठीभेटीवर भर-* गंगापूर-खुलताबाद विधानसभा निवडणूकीच्या प्रचारानिमित्त काँग्रेस पक्ष- शरदचंद्र पवार व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार सतीश चव्हाण गाठीभेटीवर भर देत असून त्यांनी आज गंगापूर तालुक्यातील बोरगाव. येसगाव, कनकोरी, दहेगाव, खुलताबाद तालुक्यातील पळसगाव, निरगुडी, पिंप्री, गल्लेबोरगाव, पळसवाडी, वेरूळ, कसाबखेडा आदी गावांना भेटी देऊन मतदारांशी संवाद साधला. याप्रसंगी बोलताना आमदार सतीश चव्हाण म्हणाले की, मागील तीन वर्षांपासून या मतदारसंघाच्या विकास कामांसाठी भरीव निधी मंजूर करून आनला. अनेक गावांमध्ये, वाडी, वस्त्यांवर दर्जेदार सिमेंट रस्ते केले, सामाजिक सभागृहे बांधले. यापुढे देखील आपण गंगापूर व खुलताबाद तालुक्याच्या सर्वांगीण विकासाची पुढाकार घेणार असून यासाठी आपण मला साथ द्यावी असे आवाहन आमदार सतीश चव्हाण यांनी मतदारांना केले. यावेळी काँग्रेसचे जेष्ठ नेते खोसरे, तालुकाध्यक्ष अशोक खासरे, शिवसनेचे तालुका प्रमुख राजु वरकड, मनसेचे जिल्हा अध्यक्ष दिलीप बनकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष रमेश निचीत, किशोर कुकलारे, विपीन बारगळ, ज्ञानेश्वर दुधारे, ॲड.लक्ष्मण प्रधान, कैलास पेहरकर, मन्सूरभाई, अनवर पटेल, किशोर पानकर, विठ्ठल बोबडे, वसीम कुरेशी, मधुकर उगले, कृष्णा गायकवाड, गंगा सोलनकर, योगेश डोंगरे, तुषार रामनाथ होले, किशोर तांबे, नवानाथ मगर, नरेंद्र साळुंके, सुनील भोसले आदींची उपस्थिती होती.

# भोकरदन येथे प्रस्थापित विरूध्द विस्थापित संघर्ष

## विकास जाधव यांच्या उमेदवारीने भोकरदन जाफराबाद विधानसभा येथील राजकारणात आशादायक चित्र

**झुंजार जनता जालना प्रतिनिधी. सागर घोडके**

मराठा आरक्षण चळवळ असो की, शेतकर्याचे प्रश्न , नगरपरिषद चा पाण्याचा प्रश्न असेल की शिक्षणाचे प्रश्न या सगळ्यांचा भोकरदन जाफराबाद मतदारांना एक उत्तर सापडले आहे ते म्हणजे परिवर्तन महाशक्ती तिसरी आघाडी चे जाधव . भोकरदन ३५ वर्षाच्या राजकारणात पहिल्यादा दोन प्रस्थापित विरुद्ध विस्थापित असा कड़ा संपर्ष पहायला मिळणार आहे. प्रस्थापित कुटुंब असलेले संतोष दानवे आणि चंद्रकांत दानवे यांनी या मतदारसंघावर आज पर्यंत आपले वर्चस्व असलेले आहे. यंदा पहिल्यांदाच विकास जाधव यांनी प्रस्थापितांना कडक टक्कर देताना दिसत आहेत. निवडणुकीच्या रिंगणात






प्रस्थापितांना चांगल्याच आणणार असल्याचे दिसत आहे. विकास भैय्या जाधव यांनी छत्रपती संभाजीराजे, राजू शेट्टी, बच्च्यु कडू यांच्या परिवर्तन महाशक्ती या तिसर्या आघाडीतील महाराष्ट्र स्वराज्य पार्टीकडून निवडणुकीच्या मैदानात आहेत. मराठा आरक्षण चळवळीत खूप मोठे योगदान आहे, भोकरदन सारख्या असुरक्षीत राजकीय वातावरणात एक नविन चेहरा असतानाही त्यांनी आपले राजकारणातील स्थान स्वतःच निर्माण केलेले युवकानं मधे चागलं वर्चस्व निर्माण झाले आहे , जाफराबाद, माहोरा, भोकरदन, धावडा, वालसावंगी, पारध,जळगांव सपकाळ,पिंपळगाव असेल या ठिकाणी फक्त सर्व सामान्य लोकांच्या मुखात एकच नाव आहे तिसऱ्या आघाडीचे विकास जाधव परिवर्तन महाशक्ती मुळे भोकरदन जाफराबाद विधानसभा निवडणुकीत नविन चेहरा मिळाला अस सर्व सामान्य लोकात चर्चा सुरू आहे.





# चेंबूरमध्ये दोन मित्रांत लढत!



## शिवसेना विरुद्ध शिवसेना सामना

**गिरीश चित्रे / मुंबई**

विधानसभा निवडणुकीत दोन शिवसेना आमनेसामने उभ्या ठाकल्या आहेत. एकेकाळच्या शिवसेनेतील दोन मित्रांनी विधानसभा निवडणुकीत एकमेकांविरोधात थंड थोपटले आहेत. महायुतीचे तुकाराम काते, तर मविआचे प्रकाश फातर्पेकर हे चेंबूर विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. येथे काते अन् फातर्पेकर या दोघांत चुरशीची लढत होणार असल्याचा अंदाज जाणकार व्यक्त करत आहेत. दरम्यान, महायुतीतील भाजपचा हिंदुत्वाचा नारा यामुळे मुस्लिम मतांची महायुतीला किती पसंती मिळते हे २३ नोव्हेंबर रोजी निकालानंतर स्पष्ट होईल.

विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे मतपेटीतून आपल्याला मतदारांचा कौल मिळावा यासाठी उमेदवार मतदारसंघ पिंजून काढत आहेत. सन २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी, काँग्रेस, भाजप यांच्यासह अन्य पक्ष, अपक्ष, बंडखोर निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. २८८ मतदारसंघांत अनेक जागांवर शिवसेना विरुद्ध शिवसेना, तर राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी अशी मॅच होणार आहे. चेंबूर विधानसभा मतदारसंघ शिवसेनेचा बालेकिल्ला मानला जातो. त्यामुळे या मतदारसंघातून प्रकाश फातर्पेकर दोन वेळा विजयी झाले आहेत. त्यात शिवसेनेशी एकनिष्ठ राहिल्याने त्यांना उद्धव ठाकरे यांनी तिसऱ्यांदा संधी दिली आहे. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतून तुकाराम काते यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे या मतदारसंघात प्रथमच शिवसेना विरुद्ध शिवसेना असा सामना रंगणार आहे.

गेल्या विधानसभा निवडणुकीत म्हणजे २०१९ मध्ये शिवसेनेच्या प्रकाश फातर्पेकर यांना ५३२६४ मते मिळाली होती, जी एकूण मतदानाच्या ४०.१५ टक्के इतकी होती. तर काँग्रेसचे चंद्रकांत हंडोरे दुसऱ्या क्रमांकावर राहिले होते. या मतदारसंघात सुरू असलेली विविध विकासकामे, पुनर्विकास प्रकल्प हा प्रचाराचा मुद्दा ठरणार आहे.

मुंबईच्या पूर्व उपनगरातील सर्वात वेगाने विकसित होणारी प्राईम लोकॅलिटी म्हणून चेंबूर विधानसभा मतदारसंघाकडे पाहिले जाते. झपाट्याने उभ्या राहणाऱ्या निवासी इमारती, मेट्रो-मोनो रेल सारख्या पायाभूत सुविधांमुळे इथल्या रियल इस्टेट मार्केटला चांगलाच प्रतिसाद मिळाला आहे. मात्र तरीही चेंबूर रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेला अजूनही झोपडपट्ट्या आहेत. चेंबूरमधल्या नागरिकांना सर्वाधिक भेडसावणारा प्रश्न म्हणजे रखडलेला पुनर्विकास आणि विकासकांकडून होणारी फसवणूक हा मुद्दा चर्चेतला आहे.

### मराठी, दलित आणि उत्तर भारतीय मते निर्णायक

चेंबूरच्या लोकसंख्येकडे पाहता या मतदारसंघात मराठी टक्का मोठा आहे. तसेच दलित आणि उत्तर भारतीय मतेही निर्णायक ठरतात. तसेच दक्षिण भारतीय आणि सिंधी-पंजाबींचे वर्चस्व असणारे काही भाग आहेत. त्यामुळे एकूणच हा मतदारसंघ संमिश्र अशा स्वरूपाचा आहे. पूर्वी काँग्रेसमधून दोन वेळा आमदार म्हणून निवडून आलेले माजी मंत्री चंद्रकांत हंडोरे यांचा या परिसरात दबदबा होता. मात्र २०१४ ला शिवसेनेने येथे मुसंडी मारली. शिवसेनेचे प्रकाश फातर्पेकर येथून निवडून आले. आता फातर्पेकर विरोधात तुकाराम काते यांच्यात खरी लढत होईल. दोन्ही शिवसेना आमनेसामने असून बाजी कोण मारणार, याची उत्सुकता सगळ्यांनाच लागली आहे.




### मतदार

| | |
|---|---|
| पुरुष | १,३४,८२९ |
| महिला | १,२३,३९७ |
| तृतीयपंथी | १० |
| एकूण | २,५८,२३६ |

# शिवसेना फोडीचे मुख्य कारण ईडी, सीबीआय - संजय राऊत



**मुंबई** : अजित पवार, छगन भुजबळ, वायकर हे ईडीला घाबरून पळाले. भाजपचे मुख्य अस्त्र ईडी, सीबीआय असून शिवसेना पक्षफोडीचे मुख्य कारण ईडी, सीबीआय आहे, अशी टीका शिवसेना खासदार संजय राऊत यांनी केली. भाजपच्या वॉशिंग मशीनमध्ये गेले ते स्वतःची कातडी वाचवण्यासाठी गेले, असा टोला संजय राऊत यांनी अजित पवार, छगन भुजबळ, वायकर यांना लगावला.

अजित पवार आणि एकनाथ शिंदे हे ईडीला घाबरून भाजपमध्ये गेलेत. कारण भाजपमध्ये गेल्यावर अनेकांच्या ईडी आणि सीबीआयच्या फाइल कपाटात बंद होतात. छगन भुजबळ, प्रताप सरनाईक, प्रफुल्ल पटेल आणि भावना गवळी काय म्हणतात याला आता काहीच अर्थ नाही. ईडीपासून बचाव करण्यासाठी, कातडी वाचवण्यासाठी हे लोक पक्ष सोडून गेले आहेत. तसे नसते, तर इतर अनेकांच्या प्रॉपर्टी मोकळ्या झाल्या नसत्या, अशी टीका राऊत यांनी केली.

माझ्यावर तसेच अनिल देशमुख यांच्यावर देखील दबाव होता. याच दबावापोटी रवींद्र वायकर पळून गेले. वायकर हे बोलू शकतात का की त्यांच्यावर दबाव नव्हता. वायकर यांच्यावर दबाव होता की, शिवसेनेला सोडा आणि भाजपसोबत या, असेही राऊत म्हणाले.

## मतदान जागृतीसाठी रॅली



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिका आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या वतीने खेतवाडी येथे मतदान जागृतीसाठी रॅली काढण्यात आली. (छाया : सलमान अन्सारी )

# बंडखोरांवर शिंदे, अजित पवारांची ॲक्शन

## राष्ट्रवादीतील आठ, तर शिवसेनेतील तिघांचे निलंबन

**मुंबई** : पक्षांतर्गत बंडखोरी करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात येत आहे. भाजपने बंडखोरी केलेल्या ४० जणांना सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित केले आहे. काँग्रेसनेही बंडखोरांवर कारवाई केली आहे. आता महायुतीतील शिंदेंची शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाने बंडखोरांना बाहेरचा रस्ता दाखवला आहे. एकनाथ शिंदे यांनी ३, तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीने ८ जणांवर कारवाईचा बडगा उगारला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुतीतील घटक पक्षांच्या उमेदवारांच्या विरोधात उमेदवारी अर्ज दाखल करून पक्षविरोधी भूमिका घेतली. तसेच महायुती सरकारची प्रतिमा मलिन करत जाणीवपूर्वक पक्ष शिस्तभंग केल्याने आठ पदाधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष बापू भेगडे, अकोला ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष कृष्णा अंधारे, नांदेड उत्तरचे जिल्हाध्यक्ष विश्वंभर पवार, नांदेड महिला जिल्हाध्यक्षा पूजा व्यवहारे, धुळ्याचे माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर भामरे, दहिसर तालुकाध्यक्षा ममता शर्मा, तुमसर (भंडारा) तालुकाध्यक्ष धनेंद्र तुरकर, युवक प्रदेश सचिव आनंद सिंधीकर आदींवर कारवाई केली आहे.

दरम्यान, पक्षाचे आदेश झुगारून पक्ष विरोधी कार्यवाही केल्याने शिवसेना शिंदे गटातील तीन जणांवर कारवाई करण्यात आली आहे. जालनाचे जिल्हाप्रमुख महेश अग्रवाल, पालघरचे प्रकाश निकम, कन्नड तालुका प्रमुख केतन काजे यांच्यावर कारवाई करण्यात आल्याचे शिवसेना ठाकरे गटाकडून सांगण्यात आले.

# वांद्रे-वर्सोवा कोस्टल रोडला सावरकरांचे नाव द्या!

## सोशल मीडियावर भाजपची जाहिरातबाजी

**मुंबई** : वीर सावरकर यांच्या नावावरून भाजप विरुद्ध काँग्रेस नेहमीच एकमेकांविरोधात उभे ठाकतात. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला चिमटा काढण्यासाठी भाजपने भविष्यात होणाऱ्या वांद्रे-वर्सोवा कोस्टल रोडला वीर सावरकरांचे नाव द्या, अशी सोशल मीडियावर जाहिरातबाजी केली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत भाजपच्या प्रचारात वीर सावरकर यांच्या नावाचा वापर केला जातोय, अशी चर्चा रंगू लागली आहे.

सन २०२४ ची विधानसभा निवडणूक सगळ्याच राजकीय पक्षांसाठी प्रतिष्ठेची झाली आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी निकाल आहे. त्यामुळे या निवडणुकीसाठी प्रचाराची रणधुमाळी जोरात सुरू आहे. महायुती व मविआकडून विविध आश्वासनांचा पाऊस पाडला जात आहे. राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत. त्यात काँग्रेस पक्षाला डिवचण्यासाठी भाजपने आपल्या प्रचारात स्वातंत्र्यवीर सावरकरांना घेतले आहे. प्रखर राष्ट्रवादी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या कार्याला नमन करणारा देवाभाऊ!, महापुरुषांच्या आदर्शाचे स्मरण ठेवण्यासाठी हवी महायुती! अशी सोशल मीडियावर जाहिरातबाजी केली जात आहे.

### ऐन निवडणुकीत काँग्रेसला चिमटा

वांद्रे-वर्सोवा सागरी सेतूसाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, गान सम्राज्ञी लता मंगेशकर, इंदिरा गांधी, उद्योगपती रतन टाटा व अन्य काही नेत्यांची नावे देण्याची मागणी राजकीय पक्षांची आहे. पण या रस्त्याला स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव देण्याची मागणी भाजपने सोशल मीडियावरील जाहिरातीतून केली आहे. ऐन निवडणुकीमध्ये वीर सावरकरांच्या नामकरणाचा मुद्दा उपस्थित करत भाजपने काँग्रेस पक्षाला चिमटा काढला आहे.

# मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध पक्षांची आश्वासने

**मुंबई : आगामी विधानसभा निवडणुकीत मतदारराजाला आकर्षित करण्यासाठी विविध पक्षांनी आपले जाहीरनामे, वचननामे यांच्या माध्यमातून आश्वासने दिली आहेत. त्यानुसार मविआ, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्ष, महायुती, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना या पक्षांच्या जाहीरनाम्यांचा घेतलेला हा आढावा.**

### अजित पवारांचे घोषणापत्र

- लाडक्या बहिणीला आता २१०० रुपये देणार
- शेतकरी कर्जमाफी
- भात शेतकऱ्यांसाठी २५ हजार प्रति हेक्टर बोनस
- अडीच लाख नोकऱ्या
- ग्रामीण भागात ४५ हजार पाणंद रस्त्यांचे बांधकाम
- अंगणवाडी आणि आशा वर्कर कर्मचाऱ्यांना १५ हजार मासिक वेतन
- सौर व अक्षय ऊर्जेला प्राधान्य देत वीजबिल ३० टक्के कमी

### ठाकरे शिवसेनेचा वचननामा

- मुंबई व महाराष्ट्र गृहनिर्माण धोरण ठरवणार
- आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ
- सरकारी कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना आणणार
- मुंबई, महाराष्ट्रातील भूमिपुत्रांना रोजगार
- जागतिक दर्जाचे आर्थिक व औद्योगिक केंद्र उभारणार
- बारसू येथील रिफायनरी प्रकल्प रद्द करणार
- विनाशकारी प्रकल्पांना परवानगी न देता पर्यावरणस्नेही उद्योगांना प्रोत्साहन देणार

### महायुतीची १० वचने

- लाडक्या बहिणींना १,५०० ऐवजी २१०० रुपये
- महिला सुरक्षेसाठी २५,००० महिलांचा पोलीस दलात समावेश
- शेतकरी सन्मान योजनेतून वर्षाला १५ हजार रुपये अनुदान
- प्रत्येक गरिबाला अन्न आणि निवारा देण्याचे वचन
- वृद्ध पेन्शनधारकांना १५०० ऐवजी २१०० रु.
- २५ लाख रोजगार निर्मिती
- १० लाख विद्यार्थ्यांना १०,००० रुपये विद्यावेतन
- ४५,००० गावांत पांदण रस्ते बांधणार
- अंगणवाडी आणि आशा सेविकांना १५ हजार रुपयांचे सुरक्षा कवच
- वीज बिलात ३० टक्के कपात करून सौर आणि अक्षय ऊर्जेवर भर देण्याचे वचन

### मविआच्या योजना

- महिलांना महिना ३ हजार रुपये
- युवकांना महिना ४ हजार
- ५० टक्के आरक्षणाची मर्यादा हटवणार
- २५ लाखांपर्यंत आरोग्य विमा
- नियमीत कर्जाची परतफेड केल्यास शेतकऱ्यांना ३ लाखांपर्यंत कर्ज माफी
- कृषी समृद्धी योजना
- जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवणार

## मतदार जागृतीसाठी आज ‘सायकल रॅली’

**मुंबई** : मतदार जागृतीसाठी निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता ‘सायकल रॅली’चे आयोजन करण्यात आले आहे. दुभाषी मैदान, गुजरात सोसायटी मार्ग, विलेपार्ले (पूर्व) येथून या रॅलीला प्रारंभ होणार आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, सह पोलीस आयुक्त (वाहतूक) अनिल कुंभारे उपस्थित राहणार आहेत.

### व्यापारी संघटनांनी केली घोषणा

# मतदान करा आणि भरघोस सवलती मिळवा



**मुंबई** : राज्यातील विधानसभा निवडणुकीत मतदान केल्यानंतर मतदारास एक तिकीट काढल्यास दुसरे मोफत तिकीट ते विविध प्रकारच्या खरेदीवर आणि हॉटेलमधील बिलात १० ते २० टक्के सूट देण्याची घोषणा व्यावसायिकांच्या संघटनांनी केली आहे.

त्यानुसार मतदान केल्याची शाई बोटावर दाखविल्यास मल्टिप्लेक्समध्ये एक तिकीट काढल्यास दुसरे तिकीट मोफत मिळणार आहे. मुंबईतील कोणत्याही हॉटेलमध्ये जेवल्यास बिलात १० ते १५ टक्के सूट दिली जाईल. रिलायन्स रिटेलमध्ये १० ते २० टक्के सूट मिळेल. महाराष्ट्र रिटेल असोसिएशनच्या सदस्य असलेल्या दुकानांमध्ये खरेदीवर १० ते १५ टक्के सूट दिली जाणार आहे. सर्व प्रकारची ही सूट मतदान केलेल्या व्यक्तीस २० नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर या कालावधीत दिली जाणार आहे.

### गेट वे ऑफ इंडिया येथे कार्यक्रम

राज्यात २० तारखेला विधानसभेसाठी मतदान होणार आहे. मतदारांच्या जागृतीसाठी निवडणूक आयोगाने शुक्रवारी गेट वे ऑफ इंडिया येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात विविध व्यापारी संघटनांनी सवलतींची घोषणा केली. या कार्यक्रमाला राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम, मुंबई महापालिकेचे आयुक्त आणि मुंबई शहर तसेच उपनगरचे निवडणूक अधिकारी भूषण गगराणी, पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, अतिरिक्त पोलीस महासंचालक अमिताभ गुप्ता तसेच सिने दिग्दर्शक रोहित शेट्टी, सिने कलावंत भारती सिंह, अनन्या पांडे, अली अजगर, वर्षा उसगावकर, मनोज जोशी, क्रिकेटर अजिंक्य रहाणे आदी मान्यवर उपस्थित होते.





## निवडक

### महालक्ष्मी जगदंबा संस्थेच्या अडचणीत वाढ

**मुंबई :** भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या महालक्ष्मी जगदंबा संस्थेला पाच एकर जमीन देण्यात आली आहे. याला मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली असून जीआर प्रसिद्ध करण्यात आला आहे. मात्र आता महालक्ष्मी जगदंबा संस्थेला दिलेल्या जागेचा अहवाल सादर करण्याचे निर्देश लोकायुक्तांनी संबंधित विभागाला दिले आहेत. चंद्रशेखर बावनकुळे यांची नागपूरमध्ये महालक्ष्मी जगदंबा संस्था आहे. या संस्थेला पाच एकर जमीन देण्यास राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. नर्सिंग, कनिष्ठ महाविद्यालय, विज्ञान-कला-वाणिज्य महाविद्यालय आणि कौशल्य विकास केंद्र बांधण्यासाठी या जमिनीचे वाटप करण्यात आले आहे. संस्थेला जागा दिल्याने किसन चौधरी यांनी याबाबत लोकायुक्तांकडे तक्रार केली होती. तक्रारीची दखल घेत लोकायुक्तांनी अहवाल सादर करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले आहेत.

### ऑनलाईन अर्ज करण्याला मुदतवाढ

**मुंबई :** आदिवासी विकास विभागातील विविध पदांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत आता १२ नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती विभागाच्या आयुक्त नयना मुंडे यांनी दिली. आदिवासी विकास विभागाने ५ ऑक्टोबर २०२४ ला विविध पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. यामध्ये अर्ज करण्याची अंतिम मुदत २ नोव्हेंबर ठेवली होती. त्यास आता १२ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच २३ नोव्हेंबर २०२३ रोजी भरती प्रक्रियेची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार अर्जाचे शुल्क विभागाने परत करण्यासाठी २८ ऑक्टोबरपर्यंत मुदत दिली होती. त्याला १२ नोव्हेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

### कुंटणखान्यातून सहा तरुणींची सुटका

**मुंबई :** ग्रँट रोड येथील एका कुंटणखान्यात डी. बी. मार्ग पोलिसांनी कारवाई करून सहा तरुणींची सुटका केली. या तरुणींना डांबून त्यांना वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी सुधीर शर्मा या ४२ वर्षांच्या कुंटणखान्याच्या मॅनेजरला पोलिसांनी अटक केली. अटकेनंतर त्याला स्थानिक न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. ग्रँट रोडच्या काँग्रेस हाऊस, नूर मोहम्मद इमारतीमध्ये एक कुंटणखाना असून तिथे काही तरुणींना जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त केले जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

### 'त्या' कर्मचाऱ्यांना निवडणूक काम नाही

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीसाठी विविध यंत्रणांकडील मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्यात आले आहे. या कामामध्ये मुंबई पालिकेच्या अत्यावश्यक सेवेतील अधिकारी आणि कर्मचारी यांचा समावेश नसल्याचे मुंबई उपनगर जिल्ह्याच्या निवडणूक शाखेने कळविले आहे. निवडणुकीचे काम करण्यासाठी निवडणूक आयोगाकडून विविध आस्थापनावरील कर्मचाऱ्यांना विविध कामासाठी घेण्यात येते. जनतेची गैरसोय होऊ नये यासाठी निवडणूक कामामध्ये मुंबई पालिकेच्या अत्यावश्यक सेवेतील अधिकारी आणि कर्मचारी यांचा समावेश करण्यात आलेला नाही.

# कुर्ल्यात दोन सेना आमनेसामने!

## प्रविणा मोरजकर यांचे कडवे आव्हान




**मतदारसंघातील समस्या**

- रस्ते, पदपथांवरील फेरीवाले, अतिक्रमणे
- अपुरा, दूषित पाणीपुरवठा
- विकास कामे रखडल्याने होत असलेली वाहतूककोंडी

**मतदारांची संख्या**

| पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|
| १ लाख ५७ हजार ४७७ | १ लाख ३४ हजार ७२४ | २ लाख ९२ हजार २१४ |

**शिरीष पवार/ मुंबई**

वर्ष २०१४ आणि २०१९ मध्ये शिवसेनेचे मंगेश कुडाळकर यांना मोठ्या मतांच्या फरकाने विजयी केलेल्या कुर्ला विधानसभा मतदारसंघात या वेळी कुडाळकर हे शिंदे सेनेचे उमेदवार असून त्यांच्याविरोधात ठाकरे सेनेच्या प्रविणा मोरजकर आहेत. यानिमित्ताने दोन्ही सेना येथे भिडणार असल्याचे चित्र आहे.

कुर्ला हा अनुसूचित जातीसाठी राखीव मतदारसंघ आहे. महाविकास आघाडीच्या जागा वाटपात ही जागा ठाकरे सेनेच्या वाट्याला आली. पण, राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे मिलिंद (अण्णा) कांबळे यांनी येथे उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांनी माघार घेतली असली तरी, बहुजन समाज पार्टी (आंबेडकर) या पक्षातर्फे उल्हासनगरचे रहिवासी असलेले अन्य एक मिलिंद (अण्णा) कांबळे रिंगणात आहेत. त्याशिवाय रा. उ. कौन्सिलचे अविनाश बर्वे, पीस पार्टीच्या सविता करंडे, एआयएमआयएमच्या अॅड. अस्मा शेख, वंचित बहुजन आघाडीचे स्वप्नील जवळगेकर, मनसेचे प्रदीप वाघमारे असे एकूण १४ उमेदवार रिंगणात आहेत. पण प्रमुख लढत ही शिवसेना शिंदे गटाचे कुडाळकर आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या मोरजकर यांच्यात आहे. मोरजकर या पालिकेच्या आरोग्य समितीच्या माजी सभापती आहेत.


वर्ष २००९ मध्ये या मतदारसंघातून शिवसेना-भाजप युतीचे मंगेश कुडाळकर, राष्ट्रवादीचे मिलिंद कांबळे आणि मनसेचे सदाशिव लोखंडे यांच्यात तिरंगी लढत झाली होती. त्यात कांबळे यांनी ६९७१ मताधिक्याने निकटचे प्रतिस्पर्धी कुडाळकर यांना पराभूत केले होते. २०१४ मध्ये मात्र शिवसेना आणि भाजप वेगवेगळे लढले तेव्हा शिवसेनेचे मंगेश कुडाळकर हे १२ हजार ६७९ मतांच्या फरकाने निवडून आले होते. त्यावेळी भाजपचे विजय कांबळे हे दुसऱ्या क्रमांकावर होते. तर, एआयएमआयएमकडून लढलेल्या अविनाश बर्वे यांनी २५ हजार ७४१ इतकी तिसऱ्या क्रमांकाची मते घेतली होती. त्यानंतर २०१९ मध्ये शिवसेना-भाजप निवडणूक युती असताना शिवसेनेतर्फे रिंगणात असलेले मंगेश कुडाळकर यांनी २१ हजार १३ मतांच्या फरकाने निकटचे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी काँग्रेसचे मिलिंद (अण्णा) कांबळे यांना पराभूत केले होते. त्यावेळी एमआयएमला १७ हजार ३४९ (१४ टक्के) मते मिळाली होती.

या मतदारसंघात मुस्लीम मते सुमारे ३० टक्के आहेत. त्याशिवाय अनुसूचित जातींची मते १३.७७ टक्के आहेत. मतदारांमध्ये उत्तर भारतीय, मराठी, राजस्थानी-गुजराती आदी विभिन्न घटक आहेत. नेहरू नगरसारख्या भागात पुनर्विकास होत चाललेल्या इमारतींमध्ये मराठी भाषिकांचे प्रमाण कमी होत चालले आहे. कुर्ला दुग्धशाळा परिसरातील जागा धारावी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी वापरली जाणार असल्याच्या चर्चेने येथील मतदारांत चलबिचलता आहे. अलिकडेच झालेल्या लोकसभा निवडणुकीत (मुंबई उत्तर-मध्य) कुर्ला क्षेत्रातून महाविकास आघाडीच्या वर्षा गायकवाड यांना २३ हजार ५८४ मतांचे अधिक्य मिळाले होते. आता महाविकास आघाडीतर्फे ठाकरे सेनेच्या मोरजकर यांनी येथे विकासासाठी बदल हवा, असा नारा दिला आहे. तर, शिंदे सेनेचे कुडाळकर यांनी विविध विकासकामांचा दाखला देत कुर्ला स्थानकाचा विकास, सॅटिसच्या धर्तीवर योजना, गिरणी कामगारांना चुनाभट्टी येथे घरे आदी मुद्दे मांडले आहेत. शिंदे सरकारच्या लाडकी बहिणसारख्या लाभार्थी योजनांचा महायुतीकडून प्रचार सुरू आहे.

## स्वागत दिवाळी अंकांचे

### कलामंच

कलामंच या दिवाळी अंकाचे यंदा २७वे वर्ष आहे. कविता, साहित्यिकांचे स्मरण लेख, कथा, पाककृती अशा विविध विषयांवरील लेखांनी यंदा कलामंच हा दिवाळी अंक परिपूर्ण झाला आहे. कलामंच या दिवाळी अंकात दिवंगत साहित्यिकांवरील स्मरण लेख असतात, हे या दिवाळी अंकाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे अशा साहित्यिकांना शब्दरूपी मानवंदना देण्याचे काम या अंकाद्वारे केले जाते. कलामंचच्या मुखपृष्ठावर लोकप्रिय अभिनेत्री मानसी नाईकचे छायाचित्र शोभून दिसत आहे. सुप्रसिद्ध लेखक, कवी चिं. त्र्यं. खानोलकर ऊर्फ आरती प्रभू यांच्या स्मरणार्थ पं. हृदयनाथ मंगेशकर यांचा 'अश्रू झाला आहे खोल' हा लेख विशेष उल्लेखनीय आहे. तर कवी ना. धों. महानोर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणारा स्मरणलेख लता गुठे यांनी लिहिला आहे. त्याचबरोबर ज्येष्ठ सिनेपत्रकार दिलीप ठाकूर यांनी अभिनेत्री लिना चंदावरकर यांच्यावर लिहीलेला लेख वाचनीय आहे. त्याचप्रमाणे संत कवयित्री कान्होपात्रा यांच्यावर गौरी कुलकर्णी यांचा, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्यावरील प्रतिष्ठा कुलकर्णी-सोनटक्के यांचा स्मरण लेख यांनी हा अंक सजला आहे. तर सहवास दिग्गज साहित्यिकांचा! या लेखातून राम देशपांडे यांनी दिग्गज साहित्यिकांच्या सहवासातून त्यांचे आयुष्य कसे बदलले याबद्दल विवेचन केले आहे. कलामंच हा दिवाळी अंक साहित्यिकांचे स्मरण लेख, कविता, पाककला या अशा साहित्यातून परिपूर्ण असा झाला आहे.




■ **संपादिका : हेमांगी अरविंद नेरकर**
■ **पाने : १८० ■ मूल्य: रु. १००/-**

# सलमानला पुन्हा धमकी

## पाच कोटींच्या खंडणीचा मेसेज

**मुंबई :** सिनेअभिनेता सलमान खानला खंडणीसाठी येणाऱ्या धमक्यांच्या मेसेजचे सत्र सुरूच असून गुरुवारी रात्री पुन्हा सलमानला एका मेसेजद्वारे पाच कोटीसाठी धमकी देण्यात आली आहे. याप्रकरणी वरळी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. या गुन्ह्याचा गुन्हे शाखेचे अधिकारी समांतर तपास करत आहेत.

गेल्या काही दिवसांपासून सलमानला सतत अज्ञात व्यक्तीकडून खंडणीसाठी धमकी येत आहे. संबंधित व्यक्तीकडून बिष्णोई टोळीच्या नावाचा वापर करून ही धमकी दिली जात आहे. चालू महिन्यात पाच ते सहा गुन्ह्यांची पोलिसांनी नोंद करून काही संशयित आरोपींना अटक केली होती. तरीही सलमानला धमकीचे सत्र सुरूच आहे. गुरुवारी रात्री पावणेबारा वाजता वाहतूक पोलिसांच्या हेल्पलाईन क्रमांकावर सलमानच्या नावाने आणखी एक मेसेज पाठविण्यात आला होता. त्यात अज्ञात व्यक्तीने तो बिष्णोई टोळीचा सदस्य असल्याचा दावा करून सलमानकडे पाच कोटींच्या खंडणीची मागणी केली होती. ही रक्कम दिली नाही तर त्याचा गेम करू अशी धमकी दिली होती. या धमकीची वरिष्ठांनी गंभीर दखल घेत पोलिसांना तपासाचे आदेश दिले आहेत. या आदेशानंतर वरळी पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेकडून समांतर तपास सुरू आहे. यातील बहुतांश धमक्या वाहतूक पोलिसांच्या हेल्पलाईन क्रमांकावर प्राप्त झाल्या आहेत.

## टेम्पोच्या धडकेत मुलाचा मृत्यू

**मुंबई :** रस्ता क्रॉस करताना टेम्पोची धडक लागून एका बारा वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. अबुजर अन्सारी असे या मुलाचे नाव असून त्याच्या मृत्यूप्रकरणी टेम्पोचालकास साकीनाका पोलिसांनी अटक केली आहे.

हा अपघात मंगळवारी दुपारी साडेबारा वाजता साकीनाका येथील ९० फिट रोड, मॅक्सेस सिनेमागृहाजवळील रस्त्यावर झाल्याचे पोलिसांनी सांगितले. अबुजर दुपारी साडेबारा वाजता मॅक्सेस सिनेमागृहासमोरून रस्ता क्रॉस करत असताना एका टेम्पोने त्याला धडक दिली. त्यात तो गंभीररीत्या जखमी झाला. त्यामुळे त्याला राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला सायन रुग्णालयात हलविण्यात आले.

# शहर राहण्यायोग्य बनवा!

## विकास नियोजन अभियंत्यांना पालिका आयुक्तांचे आवाहन

**मुंबई :** मुंबई महानगराचा विकास आराखडा बनवताना सुविधांसोबत नागरिकांच्या मागण्यांचाही विचार करावा. केवळ विकास आराखडा तयार करणे इतकेच तुमचे काम नाही, तर हे शहर लोकांना राहण्यायोग्य बनवा, असे आवाहन महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी पालिकेच्या विकास नियोजन खात्याच्या अभियंत्यांना गुरुवारी केले.

> ज्या कारणांसाठी विकास आराखडा बनवला आहे, त्यानुसारच त्यावर अंमलबजावणी व्हायला हवी. विकास आराखडा बनवताना आवश्यक सुविधा आणि नागरिकांच्या मागण्या यांचा विचार प्रकर्षाने केला जावा. प्रशासकीय विभाग (वॉर्ड) स्तरावर कार्यरत असलेले विकास नियोजनाशी संबंधित अभियंत्यांनी प्रत्येक वॉर्डला स्वतंत्र शहर गृहित धरून त्यानुसार आराखडा तयार करण्यास प्राधान्य द्यावे. वॉर्डस्तरावरील उपलब्ध जागा, आरक्षण आदींच्या मागील दहा वर्षांमधील आकडेवारीचा अभ्यास करून पुढील नियोजन करावे.
>
> **- भूषण गगराणी**, पालिका आयुक्त



माजी सनदी अधिकारी डॉ. रमानाथ झा यांच्या उपस्थितीत महानगरपालिका मुख्यालयात विकास नियोजन विभागाची आढावा बैठक झाली. त्यावेळी गगराणी म्हणाले की, केवळ टोलेजंग इमारती किंवा भव्य रस्ते म्हणजेच विकास नव्हे, तर नागरिकांना गुणवत्तापूर्ण मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि शहर त्यांच्यासाठी राहण्यायोग्य बनवणे फार महत्त्वाचे असते. केवळ विकास आराखडा तयार करून विकास नियोजन अभियंत्यांची जबाबदारी संपत नाही, तर त्याची अंमलबजावणी होऊन शहराला राहण्यायोग्य बनविणे हीसुद्धा त्यांची जबाबदारी आहे. त्यामुळे, महानगरपालिकेच्या विकास नियोजन विभागात कार्यरत प्रत्येक अधिकारी व अभियंत्यांनी सक्रिय होऊन अत्यंत सजगतेने कार्य करावे. विकास आराखडा बनवताना सुविधांच्या उपलब्धतेसोबतच नागरिकांच्या मागण्यांचाही विचार करावा, अशी सूचना गगराणी यांनी केली.

माजी सनदी अधिकारी तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेंटर फॉर कपॅसिटी बिल्डिंग अँड रिसर्चचे (एमसीएमसीआर) महासंचालक डॉ. रमानाथ झा, महानगरपालिका सह आयुक्त (महानगरपालिका आयुक्त कार्यालय) चंद्रशेखर चोरे, प्रमुख अभियंता (विकास नियोजन) सुनील राठोड यांच्यासह संबंधित अधिकारी व अभियंता यावेळी उपस्थित होते. सुरुवातीला विकास नियोजन विभागाचे कामकाज, विकास आराखडा, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील उपलब्ध जागा आणि त्यावरील आरक्षण आदींबाबत सादरीकरण करण्यात आले.

# राजावाडी रुग्णालयात कामबंद आंदोलन

## कर्मचाऱ्याला मारहाण केल्याचा निषेध

**मुंबई :** महानगरपालिकेच्या घाटकोपर येथील राजावाडी रुग्णालयात रुग्णाच्या नातेवाईकांनी डॉक्टर तसेच कर्मचाऱ्यांना केलेली मारहाण तसेच सातत्याने असे प्रकार घडत असल्याच्या निषेधार्थ कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन केले.



**सुरक्षारक्षकांची संख्या वाढवण्याची मागणी**

या घटनेच्या निषेधार्थ रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी व कामगार यांची सभा घेण्यात आली. पालिका रुग्णालयांत पुरेसे सुरक्षारक्षक नसल्यामुळे त्यांची संख्या वाढवावी, अशी मागणी युनियनने केली आहे.

म्युनिसिपल मजदूर युनियनचे अध्यक्ष अशोक जाधव, सहाय्यक सरचिटणीस शैलेंद्र खानविलकर व सहचिटणीस सूर्यकांत गुढेकर यांनी रुग्णालयात जाऊन वैद्यकीय अधीक्षक यांच्याशी सविस्तर चर्चा केली. मारहाण व धमकीबाबत रुग्णाच्या नातेवाईकांवर त्वरीत कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी कामगारांनी कामबंद आंदोलन केले.

५ नोव्हेंबरला रात्री ११ वाजता एका रुग्णाला त्याच्या नातेवाईकांनी राजावाडी रुग्णालयात दाखल केले. रुग्णाची प्रकृती गंभीर झाल्याने त्याला व्हेंटिलेटरवर ठेवावे लागेल असे नातेवाईकांना सांगण्यात आले. त्यावर नातेवाईकांनी तेथील एकमेव शॉक द्यायची मशीन तोडली आणि लॅरेंजर स्कोप फोडण्यात आला. तसेच टेबलवर असणारे पिनबॉक्स डॉक्टरांच्या दिशेने फेकून मारले. तेथील डॉक्टर व सफाई कामगार यांना शिवीगाळ करीत धमकावले, असा आरोप आहे. सफाई कामगार नितेश सादरे यांना मारहाणही करण्यात आली. याबाबत पोलिसांत तक्रार करण्यात आली आहे.

## जयदीप आपटेची हायकोर्टात धाव

**मुंबई :** मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारताना निष्काळजीपणा केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेला शिल्पकार जयदीप आपटेने जामिनासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली. या याचिकेची न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या एकलपीठाने दाखल घेत सरकारी पक्षाला नोटीस जारी करून १२ नोव्हेंबरला उत्तर सादर करण्याचे आदेश दिले.

राजकोट किल्ला परिसरात उभारलेला शिवपुतळा आठ महिन्यांत कोसळला. पुतळा उभारणीचे निकृष्ट काम उघड झाल्यानंतर शिल्पकार जयदीप आपटेला कल्याणमधून अटक करण्यात आली. न्यायालयीन कोठडीत असलेल्या आपटेने सिंधुदुर्ग जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज केला होता.

# रविवारी मध्य रेल्वे मार्गावर मेगाब्लॉक

**मुंबई :** अभियांत्रिकी आणि देखभालीच्या कामांसाठी मध्य रेल्वे मार्गावर रविवारी ब्लॉक घेण्यात येणार आहे. रविवारी सकाळी ११ वाजून ५ मिनिटांपासून ते दुपारी ३ वाजून ५ मिनिटांपर्यंत माटुंगा-मुलुंड अप आणि डाऊन जलद मार्गावर ब्लॉक असेल.

सीएसएमटीहून सकाळी १० वाजून २५ मिनिट ते दुपारी २ वाजून ४५ मिनिटांपर्यंत सुटणाऱ्या डाऊन जलद मार्गावरील सेवा माटुंगा आणि मुलुंड स्थानकादरम्यान डाऊन धीम्या मार्गावर वळवण्यात येतील. या गाड्या निर्धारित वेळेच्या १५ मिनिटे उशिरा पोहोचतील. ठाण्याच्या पलीकडे असलेल्या जलद गाड्या मुलुंड स्थानकावर डाऊन फास्ट मार्गावरून पुन्हा वळवण्यात येतील.

सकाळी १० वाजून ५० मिनिटे ते दुपारी ३ वाजेपर्यंत ठाण्याहून सुटणाऱ्या अप जलद मार्गावरील सेवा मुलुंड येथे अप धीम्या मार्गावर वळवण्यात येतील. मुलुंड आणि माटुंगा स्थानकांदरम्यान त्यांच्या संबंधित थांब्यांनुसार थांबतील आणि माटुंगा स्थानकावर अप जलद मार्गावर पुन्हा वळवण्यात येतील आणि पोहोचतील.



**हार्बर मार्गावर या ठिकाणी ब्लॉक**

अप आणि डाऊन हार्बर मार्गावर सीएसएमटी ते चुनाभट्टी/वांद्रे दरम्यान सकाळी ११ वाजून १० मिनिटे ते दुपारी ४ वाजून ४० मिनिटांपर्यंत ब्लॉक असेल. त्यामुळे वाशी/नेरूळ/पनवेलकडे जाणाऱ्या डाऊन हार्बर मार्गावरील सेवा आणि सीएसएमटीहून सुटणाऱ्या वांद्रे/गोरेगावकडे जाणाऱ्या डाऊन सेवा रद्द राहतील. ब्लॉक कालावधीत पनवेल-कुर्ला-पनवेल दरम्यान विशेष सेवा चालवल्या जातील.

**भारत जोडो अभियानचे फडणवीसांना आव्हान**

# अर्बन नक्षल संघटनांची यादी जाहीर करा

**मुंबई :** भारत जोडो अभियानमधील अराजक माजवणाऱ्या अर्बन नक्षल संघटनांची यादी जाहीर करा व कारवाई करा, असे जाहीर आव्हान अभियानने गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.

**विचलित मुळीच होणार नाही**

आम्ही अशा दिशाभूल करणाऱ्या विधानांनी विचलित होणार नाही, संविधानिक दिशेतील आमची वाटचाल चालूच राहील असा निर्धार भारत जोडो अभियान करत आहे, असे योगेंद्र यादव, उल्का महाजन, संजय मं.गो., ललित बाबर यांनी म्हटले आहे.

काल व परवा गृहमंत्री व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारत जोडो अभियानवर केलेल्या आरोपांचा व हे अराजक माजवणारे अर्बन नक्षल आहेत या विधानाचा भारत जोडो अभियान तीव्र निषेध अभियानतर्फे करण्यात आला.

आम्ही महाराष्ट्रातील संतपरंपरामधून रुजवलेले विचारांचे बीज घेऊन, गौतम बुद्ध व महात्मा गांधी यांनी दिलेल्या अहिंसेच्या तत्त्वावर चालणारे नागरिक आहोत. महात्मा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारे नागरिक आहोत. कष्टकरी समाजाला सन्मान मिळावा म्हणून आयुष्य वेचलेले हजारो कार्यकर्ते संविधान व लोकशाही वाचवण्यासाठी आज निवडणुकीत उतरले आहेत, सरकारला जाब विचारत आहेत, भ्रष्ट नेत्यांची पोलखोल करत आहेत, जातीयवाद पसरविणाऱ्या धोरणाचा पर्दाफाश करत आहेत, कष्टकरी समाजाला जागवत आहेत, संविधानिक जबाबदारीचे भान देत आहेत. यातून भाजपच्या विकृत, धर्मांध व संविधान विरोधी राजवटीला आव्हान दिले जात आहे म्हणून फडणवीस सैरभैर झाले आहेत, त्या मानसिकतेतून अशी दिशाभूल करणारी वक्तव्ये केली जात आहेत, असे अभियानने म्हटले आहे.

तुम्ही कोणाच्या विरोधात संभ्रम निर्माण करत आहात. तसेच हे गृहमंत्री या नात्याने तुम्हाला आधीच माहित होते, तर यापूर्वीच कारवाई का केली नाही? निवडणूकीच्या तोंडावर ही विधाने का केली जात आहेत? असा सवालही उपस्थित केला आहे.

## उपचाराच्या बहाण्याने महिलेची फसवणूक

**मुंबई :** गुडघे दुखीवर उपचाराच्या नावाखाली तोतया डॉक्टरसह त्याच्या सहकाऱ्याने एका वयोवृद्ध महिलेची ७.२० लाखांची फसवणूक केली. तीन वर्षांनंतर महिलेच्या मुलीने ओशिवरा पोलिसांत दोन्ही आरोपीविरुद्ध तक्रार केली. या तक्रारीनंतर विनोद गोयल आणि डॉ. जाफरभाई मर्चंट या दोन्ही आरोपीविरुद्ध ओशिवरा पोलिसांनी अपहारासह फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

उपचारातून काडीमात्र फरक पडला नाही. त्यामुळे महिलेने विनोद आणि जाफरभाईला कॉल केला होता. मात्र या दोघांनी तिला प्रतिसाद दिला नाही.

# अंधेरी-कांदिवलीतील दोन अपघातांत दोघांचा मृत्यू

**मुंबई :** अंधेरी आणि कांदिवलीतील दोन विविध अपघातांत दोघांचा मृत्यू झाला. श्रीराज प्रकाश माने आणि रोहित गौतम अशी मृतांची नावे आहेत. याप्रकरणी ओशिवरा आणि समतानगर पोलिसांनी दोन स्वतंत्र अपघाताची नोंद करून एका डंपरचालकास अटक केली. तर दुसरा चालक अपघातानंतर पळून गेला आहे. त्याचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.

पहिला अपघात बुधवारी सकाळी कांदिवलीतील ठाकूर कॉम्प्लेक्स परिसरात झाला. श्रीराज माने हा कांदिवलीतील सिंग इस्टेट अंजिक्य तारा सोसायटीमध्ये त्याच्या कुटुंबीयांसोबत राहत होता. वसईतील एका नामांकित कॉलेजमध्ये तो शिक्षण घेत होता. बुधवारी सकाळी तो नाश्ता करण्यासाठी त्याच्या बाईकवरून ठाकूर कॉम्प्लेक्स येथून जात होता. यावेळी त्याच्या बाईकला दूधाच्या टँकरने धडक दिली. त्यात तो गंभीररीत्या जखमी झाला. जखमी झालेल्या श्रीराजला तातडीने जवळच्या शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले.

दुसरी अपघाताची घटना बुधवारी सकाळी अंधेरीतील बँक रोडवर घडली.

## निवडक

### शिक्षक पात्रता परीक्षा १० नोव्हेंबरला

**अलिबाग :** महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत रविवारी (दि.१०) शिक्षक पात्रता परीक्षा घेण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ३ केंद्रांवर परीक्षा पार पडणार आहे. परीक्षा प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे व रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या उपस्थितीत गुरुवारी आढावा घेण्यात आला. रायगड जिल्ह्यात शिक्षक पात्रता परीक्षा पनवेल तालुक्यातील के. आ. बांठिया माध्यमिक विद्यालय, कळंबोली येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व नवीन पनवेल येथील चांगु काना ठाकूर विद्यालय या तीन केंद्रांवर पार पडणार आहे.

### उल्हासनगरमध्ये मतदार जागरूकता रॅली

**उल्हासनगर :** लोकशाही ही केवळ एक प्रणाली नसून, ती आपल्या हक्काची अभिव्यक्ती आहे. या विचाराने प्रेरित होत उल्हासनगरमधील नामांकित एसएसटी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाने मतदाता जागरूकता अभियानाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. यामध्ये युवकांना मतदानाचे महत्त्व समजवून देऊन, लोकशाही प्रक्रियेतील त्यांच्या महत्त्वाच्या सहभागाचे आकलन घडविण्याचा उद्देश होता. या अभियानाने उल्हासनगरच्या शैक्षणिक वातावरणात एक सकारात्मक बदल घडवून आणला. महाविद्यालयाच्या NSS विभागाने मतदान हे केवळ अधिकार नसून ते एक जबाबदारी आहे या संदेशासह अनेक युवकांना आपल्या मतदान अधिकाराची जाणीव करून देण्यात आली.

# निवडणुकीच्या कामांमुळे प्रशासकीय यंत्रणा कोलमडली

## भिवंडी महापालिकेची कर वसुली खोळंबली

### कार्यालयात चकरा माराव्या लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी

#### नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात रोष

वास्तविक दररोज ६ लाख रुपयांच्या आसपास वसुली होत असते. मात्र, ५ नोव्हेंबर रोजी सुमारे ५ लाख ७६ हजार रुपये महापालिकेच्या खात्यात जमा झाले आहेत, जे अपेक्षेपेक्षा खूपच कमी आहे. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे कर भरण्यात अडचण येत असल्याच्या तक्रारी वाढत आहे. महानगरपालिकेच्या कार्यालयात निवडणुकीच्या कामासाठी कर्मचारी गेल्याचे कारण सांगितल्याने नागरिकांना कर न भरताच परतावे लागत असल्याने नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात रोष व्यक्त होत आहे.





> महापालिकेच्या कर आकारणी विभागासह पाचही विभागीय समिती कार्यालयातील शंभरहून अधिक भूभाग लिपिक व कर आकारणी विभागाचे कर्मचारी निवडणूक कामांसाठी रूजू झाले आहेत. त्यामुळे कार्यालये ओस पडली आहेत.
> - **सुधीर गुरव**, कर निर्धारण विभाग प्रमुख भिवंडी महापालिका

**भिवंडी :** भिवंडी महापालिकेच्या कर निर्धारण विभागातील सुमारे शेकडो कर्मचारी विधानसभा निवडणुकीच्या कामात गुंतल्याने महापालिकेची कर वसुली पूर्णपणे कोलमडली आहे. त्यामुळे करदात्यांना कार्यालयात चकरा माराव्या लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. सध्या महापालिकेच्या खात्यात ६ लाखांपेक्षा कमी कर जमा होत असल्याने महापालिका प्रशासनाची अवस्था आणखीनच बिकट होत आहे.

भिवंडी महापालिका कर आकारणी विभागाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महापालिकेची जुनी आणि नवीन मिळून एकूण ७१३ कोटी रुपयांची मालमत्ता कर थकबाकी असून, या वसुलीसाठी महापालिका आयुक्त अजय वैद्य यांनी १२५ कोटी रुपयांचे वसुलीचे उद्दिष्ट दिले आहे. मनपा कर्मचाऱ्यांनी मेहनत करूनही एप्रिल ते ५ नोव्हेंबर या कालावधीत सुमारे २६ कोटी रुपये वसूल होऊ शकली. या शिवाय दोन दिवसांनी अभय योजनाही राबविण्यात आली. १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत आचारसंहिता लागू झाल्यानंतर १ कोटी ३० लाख रुपयांचा कर वसूल झाला आहे. त्यापैकी बहुतांश कर निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांनी भरल्यामुळे हा आकडा वाढला आहे. सध्या कर मुल्यांकन कार्यालयात एकूण १५ कर्मचारी कार्यरत आहेत. मात्र इतर कर्मचारी वसुलीला जात असल्याने सध्या केवळ दोनच महिला कर्मचारी कार्यालयात काम करीत आहेत. कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे त्यांच्या विभागाचे काम ठप्प झाले आहे. जे कर भरण्यासाठी येतात त्यांना कर जमा करणेही शक्य होत नसल्याने थकीत कराची वसुली कमी झाल्याने महापालिकेची आर्थिक स्थिती बिकट होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.


## नवी मुंबईत दैनंदिन कामाला फटका!



**नवी मुंबई :** महापालिकेचे बहुतांश कर्मचारी विधानसभा निवडणुकीच्या कामाला गेल्याने शहरातील दैनंदिन कामावर त्याचा परिणाम झाला आहे. नवी मुंबई महानगरपालिकेचे १ हजार २०० हून अधिक कर्मचाऱ्यांची निवडणुकीच्या कामाकरिता नियुक्ती करण्यात आली आहे. आहे.

या कर्मचाऱ्यांना बी.एल.ओ., केंद्र अध्यक्ष, मतदान अधिकारी, भरारी पथक, कार्यालयीन कामकाज कर्मचारी, मतदान जनजागृती, शिपाई आदी कामांसाठी कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. मागील दोन महिन्यांपासून यातील अनेक कर्मचारी ऐरोली-बेलापूर यासह अन्य विधानसभा कार्यालयात दैनंदिन कामाकरिता नियुक्त केले आहेत.

## उरणमधील कार्यालयात शुकशुकाट



**उरण :** विधानसभा निवडणुकीच्या कामासाठी शासकीय कर्मचाऱ्यांना जुंपल्याने शासकीय कामकाजावर मोठ्या प्रमाणात परिणाम होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्यामुळे शासकीय कार्यालयाबाहेर नागरिकांची गर्दी होत असून त्यांना वारंवार कार्यालयाचे हेलपाटे घालावे लागत आहेत.

निवडणुकीच्या कामात पालिकेच्या आपत्कालीन, रस्ते, पूल, पर्जन्य जलवाहिनी, मलनिःसारण जलवाहिनी विभागातील कर्मचाऱ्यांचा सहभाग करून घेतल्याने नगरपरिषद, ग्रामपंचायत, महसूलच्या कामकाजासह पायाभूत सुविधांवर देखील परिणाम होत असून अनेक ठिकाणी शासकीय कामे ठप्प पडली आहेत.

आगामी उरण विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महसूल, नगरपरिषद, जिल्हा परिषदेच्या सुमारे २ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

आता जिल्हाधिकारी कार्यालयांकडून कर्मचाऱ्यांची निवडणूक कामांसाठी नियुक्ती केली जात असल्यामुळे या कामातून कोणाचीही सुटका होत नाही. महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी आणि कर्मचारी, तहसील कार्यालयातील तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, शिपाई तर पंचायत समिती कार्यालयातील बिडीओ, गट शिक्षण अधिकारी आणि कर्मचारी तसेच नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि कर्मचाऱ्यांना या निवडणुकीच्या कार्यात जुंपल्याने कार्यालये ओस पडली असून सर्व शासकीय कामे ठप्प झाली आहेत.

# २१ दिवसांत एक कोटीचे मद्य जप्त

## १८० जणांना अटक, २७९ गुन्हे दाखल

**ठाणे :** विधानसभा निवडणुकीच्या काळात राज्य उत्पादन शुल्क विभागाने टाकलेल्या धाडीमध्ये २१ दिवसात तब्बल एक कोटी रुपयांचे मद्य जप्त करण्यात आले आहे. हा मद्यसाठा जप्त करण्याबारोबरच १८० जणांना यामध्ये अटक देखील करण्यात आली असल्याचे उत्पादन शुल्क विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्यात विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून १५ ते ६ नोव्हेंबर या कालावधीत राज्य उत्पादन शुल्क विभागातील पथकाने रसायन, हातभट्टी, देशी मद्य, विदेशी मद्य, बिअर, वाईन, शॅम्पेन, ताडी आदी मुद्देमालांवर कारवाई केली. ठाणे जिल्ह्यात खाडीकिनारी गावठी दारूच्या हातभट्ट्या उद्ध्वस्त केल्या. भरारी पथकाकडून ९२ भट्ट्यांवर कारवाई करण्यात आली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक प्रवीण कुमार तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन विशेष भरारी पथकाची निर्मिती करण्यात आली असून या पथकात एक निरीक्षक, दोन उपनिरीक्षक, चार कॉन्स्टेबल, एक वाहक अशा आठ जणांचा समावेश आहे.

### भरारी पथकाची विशेष नजर



निवडणुकीच्या काळात परराज्यातून मद्य चोरून आणले जाते. गोवा, दमण तसेच गुजरात येथून येणाऱ्या खासगी बसेसवर भरारी पथकाची विशेष नजर ठेवण्यात आली आहे. पडघा, मुंब्रा बायपास आणि खारघर टोलनाका या तीन ठिकाणी तपासणी नाके निर्माण केले आहेत. तसेच याप्रकरणी अवैध मद्याबाबत तक्रार असल्यास १८००२३३९९९९ यावर संपर्क साधण्याचे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाचे ठाणे अधीक्षक प्रवीण कुमार तांबे यांनी केले आहे.

### केंद्रीय मंत्री रामदास आठवले रविवारी कामोठेत

**पनवेल :** भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार प्रशांत ठाकूर यांच्या प्रचारार्थ केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांची रविवार, १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता कामोठे येथे जाहीर सभा होणार आहे.

सेक्टर ११ मधील सुषमा पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे होणाऱ्या या सभेला माजी खासदार रामशेठ ठाकूर, महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह महायुतीतील इतर पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# भिवंडीत ४३ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

## एकास अटक

**भिवंडी :** भिवंडी आणि कल्याणमध्ये प्रतिबंधित गुटख्याच्या विक्रीसाठी दोन वाहनांतून आलेल्या ४ जणांवर भोईवाडा पोलिसांनी सापळा रचून तब्बल ४३ लाखांचा गुटखा जप्त करीत एकास अटक केली आहे. अंकित राजेंद्र पाल (२३), आदिल, असरफ शेख, राजेश पांडे अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे असून यातील अंकित यास बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजताच्या सुमारास भिवंडीतून दोन वाहनांमधून प्रतिबंधित गुटख्याची तस्करी केली जाणार असल्याची माहिती पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत प्राप्त झाली होती, त्यानुषंगाने भोईवाडा पोलिसांनी सोमानगरसमोरील जामा मस्जिद रोडवर सापळा रचला होता. त्यावेळी पोलिसांना संशयित पिकअप गाडी क्र. एमएच ४८ सीबी ३४५८ व टाटा अल्ट्रा एमएच ४८ सीबी ७६४२ जात असताना दिसून आल्याने पोलिसांनी दोन्ही गाड्यांची झाडझडती घेऊन तब्बल ४८ लाख १८ हजार ५०० रुपये किमतीचा प्रतिबंधित सुगंधित गुटखा जप्त केला आहे.

तर सदर प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक वरील ४ जण आपसात संगनमताने भिवंडी व कल्याण येथे विक्रीसाठी नेत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात पोशि बाळु विठ्ठल चव्हाण यांच्या फिर्यादीवरून वरील चौघांविरोधात गुन्हा दाखल केला असून अंकित यास अटक केली आहे. पुढील तपास सपोनि एस. व्ही. महाले करीत आहेत.


# केमप्लास्ट सॅन्मरला दुसऱ्या तिमाहीत तोटा

**मुंबई :** एसएचएल केमिकल्स समूहाचा भाग असलेल्या केमप्लास्ट सॅन्मर कंपनीने यंदाच्या जुलै ते सप्टेंबर तिमाहीत ३१ कोटी रुपयांचा तोटा नोंदविला आहे. दक्षिणेतील कंपनीनेच गेल्या आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीत २६ कोटी रुपयांचा करोत्तर नफा नोंदविला होता. सप्टेंबर २०२४ रोजी संपलेल्या सहामाहीत कंपनीला ७ कोटी रुपयांचा तोटा झाला आहे. तो मागील आर्थिक वर्षातील याच कालावधीत ३८ कोटी रुपयांचा होता. कंपनीचा परिचलनातील महसुल तिमाहीत किरकोळ वाढून ९९३ कोटींवर गेला आहे. तो मागील वर्षीच्या कालावधीत ९८८ कोटी होता.

सप्टेंबर २०२४ रोजी संपलेल्या सहा महिन्यांच्या कालावधीत परिचलनातील महसूल ८ टक्क्यांनी वाढून २,१३८ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. मागील आर्थिक वर्षाच्या याच सहा महिन्यांत तो १,९८४ कोटी रुपयांवरून यंदा वाढला आहे.

# आचारसंहितेचा बागुलबुवा करू नका

## ■ हायकोर्टाने बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाला फटकारले ■ परिपत्रक केले रद्द



**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेचा बागुलबुवा करत कामगारांची नवीन नोंदणी, नूतनीकरण आणि अन्य योजना थांबवणाऱ्या कल्याणकारी मंडळाला मुंबई उच्च न्यायालयाने चांगलेच धारेवर धरले. न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर आणि न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरसेन यांच्या खंडपीठाने आचारसंहितेची सबब सांगून कामगारांच्या कल्याणकारी योजना थांबवू नका, अशा शब्दांत सुनावत बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने याबाबत काढलेला आदेश रद्द केला.

बांधकाम कामगारांसाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने आचारसंहितेचे कारण पुढे करत कामगारांची नवीन नोंदणी, नोंदणीचे नूतनीकरण, कल्याणकारी योजनांचे वितरण अशा विविध सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. तसे परिपत्रक जारी केले. या परिपत्रकाला आक्षेप घेत बांधकाम कामगारांच्या विविध संघटनांनी उच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल केली.

या याचिकांवर सुट्टीकालीन न्यायालयाचे न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर आणि न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरसेन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. खंडपीठाने याचिकेची गंभीर दखल घेत मंडळाला चांगलेच धारेवर धरत परिपत्रक रद्द केले.

# पालिकेच्या आरोग्यनिधीचे गैरव्यवस्थापन

## दवाखान्यांतील कर्मचारी संख्या कमतरतेत तिप्पट वाढ

**मुंबई :** २०१८-१९ ते २०२४-२५ या सात वर्षांत मुंबई महापालिकेच्या आरोग्यावरील तरतुदीत ३,६३७ कोटींवरून ७,१९१ कोटी रुपये अशी तब्बल ९८ टक्के वाढ होऊनही, दशकभरात पालिका दवाखान्यांतील आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता तिपटीने वाढली आहे. त्याचा फटका आरोग्य सुविधांमध्ये बसत असल्याचा आरोप होत आहे.

मुंबई महापालिकेने प्राथमिक आरोग्य सुविधांवर पाहिजे त्या प्रमाणात निधी खर्च केलेला नाही. त्याचप्रमाणे बराचसा निधी हा वापराविना पडून राहिलेला आहे. हे पालिकेचे प्रशासकीय अपयश आहे, असे मत प्रजा फाऊंडेशनचे कार्यकारी अधिकारी मिलिंद म्हस्के यांनी व्यक्त केले आहे.

प्रजा फाऊंडेशनने जाहीर केलेल्या मुंबईतील आरोग्य समस्यांविषयक अहवालात पालिकेची तरतूद आणि कर्मचारी कमतरता यांचा उल्लेख केला आहे. पालिका रुग्णालयांत २०१४ मध्ये कर्मचारी संख्येच्या कमतरतेचे प्रमाण १२ टक्के होते. हे प्रमाण वाढत २०२३ मध्ये ३७ टक्के झाले आहे.

दर १५ हजार लोकसंख्येमागे एक दवाखाना असला पाहिजे, असा यूआरडीपीएफआय (शहरी आणि प्रादेशिक विकास योजना आखणी आणि अंमलबजावणी)चा दंडक आहे. त्याची पूर्तता २०२३ पर्यंत मुंबईतील एकाही विभागात झाली नव्हती. एकूण २०७ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखान्यांपैकी ९७ दवाखाने हे सध्याच्या पालिका दवाखान्यांत त्यांचे कामकाज संपल्यानंतर चालवले जातात. केवळ ११० हिंदुहृदयसम्राट दवाखाने स्वतंत्र जागांत चालविले जातात. मुंबईत निकषाच्या तुलनेत ५२५ दवाखाने कमी आहेत. यातील ९५ टक्के दवाखाने (१८१) दिवसातून केवळ सात तास सुरू असतात, असे अहवालात म्हटले आहे.

### हवेच्या दर्जात घसरण

मुंबईत हवेची गुणवत्ता खालावत चालली आहे. २०१९ ते २०२२ पर्यंत हवा गुणवत्ता निर्देशांक समाधानकारक (५१ ते १०० एक्यूआय) श्रेणीतून मध्यम (१०१- २०० एक्यूआय) श्रेणीत घसरला आहे. याच काळात श्वसनाच्या गंभीर आजारांनी ३३ हजार ७११ लोकांचा मृत्यू झाला आहे. त्याशिवाय आणखी १६ हजार ३४५ मृत्यू क्षयरोगामुळे झाले आहेत, अशी माहिती प्रजाचे सहयोगी व्यवस्थापक एकनाथ पवार यांनी दिली.

# न्यायालयात पालिकेची बाजू प्रभावीपणे मांडा

## विधी विभागाला आयुक्त गगराणी यांच्या सूचना

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भात न्यायालयात दाखल होणाऱ्या सर्व प्रकरणांची तातडीने नोंद घेऊन आवश्यकतेप्रमाणे योग्य उत्तर दाखल करावे. महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या मदतीने प्रतिज्ञापत्र सादर करावे. दावा सुनावणीच्या दिवशी न्यायालयात उपस्थित राहून, महानगरपालिकेची बाजू प्रभावीपणे मांडावी, अशी सूचना पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी पालिकेच्या विधी विभागाला केली आहे. दिरंगाई व निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अथवा सूचनांची तातडीने अंमलबजावणी करावी. न्यायालयात विहित कालावधीत परिच्छेदनिहाय अभिप्राय व शपथपत्र दाखल करण्याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश गगराणी यांनी दिले आहेत. महानगरपालिकेच्या इतर विभागातील अधिकाऱ्यांना कायद्याचे ज्ञान व्हावे यासाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येतील, असे देखील त्यांनी नमूद केले.

गगराणी यांनी महानगरपालिका विधी विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणी संग्रहालयातील पेंग्विन कक्षाच्या सभागृहात ही बैठक पार पडली.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, सहआयुक्त (महानगरपालिका आयुक्तांचे कार्यालय) चंद्रशेखर चोरे, उप आयुक्त (सामान्य प्रशासन) किशोर गांधी, कायदा अधिकारी अॅड. कोमल पंजाबी आदी यावेळी उपस्थित होते. प्रारंभी पंजाबी यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे विधी खात्याच्या कामकाजाची माहिती दिली.

### 'अधिक समन्वयाची आवश्यकता'

महानगरपालिकेच्या सर्व खात्यांना कायदेविषयक सल्ला / अभिप्राय देणे, विविध न्यायालयात दाखल होणारे दिवाणी व फौजदारी खटले चालविणे आदी महत्त्वाची कार्यवाही विधी खात्यामार्फत केली जाते. यात अधिक समन्वय साधण्याची आवश्यकता असल्याचे गगराणी यांनी स्पष्ट केले. महानगरपालिकेच्या मालमत्तांसंबंधी व अन्य विविध प्रकरणांसंबंधी करारनामे, भाडेपट्टा, मक्ता, खरेदी खत, महापालिकेच्या मालमत्तेसंबंधातील समझोत्यांची निवेदन पत्रके बनविणे, विकास नियंत्रण नियमावली व महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमान्वये महानगरपालिकेकडून ताब्यात घ्यावयाच्या मालमत्तांच्या मालकांचा शोध घेऊन मालमत्तांवरील मालकी हक्क निश्चित करणे, महानगरपालिकेने हाती घेतलेल्या अनेक प्रकल्पांबाबत करारनामे बनविणे आदी कामे देखील विधी विभागामार्फत केली जातात.

# सारेगामा इंडियाच्या नफ्यात घसरण

**कोलकाता :** सारेगामा इंडिया लिमिटेडच्या निव्वळ नफ्यात ६.२ टक्क्यांनी घसरण झाली असून चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत नफा ४४.९५ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. २०२४-२५ या एकूण आर्थिक वर्षात महसुलात ४०.५ टक्के वाढ झाली आहे. सारेगामा इंडियाने गेल्या आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीत ४७.९९ कोटी रुपयांचा नफा कमावला. सप्टेंबर रोजी संपलेल्या तिमाहीत कंपनीने २४१.८३ कोटी रुपयांचा महसूल नोंदवला. तिमाहीत कंपनीचा परिचालन खर्च ४०.६० कोटींवरून दुप्पट होत ८७.१२कोटी झाला आहे.

Printed By, Published By, on behalf of: **Ismail Salim Shaikh,** Printed at Meher Creative Graphics, Chistiya Colony, N-5, Cidco, Tq. & Dist. Aurangabad 431003 (Maharashtra) and published from **Zunjar janta** gulshan nagar, Sillod, Tq. Sillod, Dist. Aurangabad - 431112 (Maharashtra), Editor - **Ismail Salim Shaikh,** Mob:- **8180068180** E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक **इस्माईल सलीम शेख** यांनी मेहेर क्रिएटिव्ह ग्राफिक्स चिश्तिया कॉलोनी -५ सिडको औरंगाबाद - ४३१००१ (महाराष्ट्र) येथे छापून, **झुंजार जनता,** कार्यालय गुलशन नगर सिल्लोड ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद -४३१११२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - **इस्माईल सलीम शेख** संपर्क ८१८००६८१८० E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**